*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

# UNIT 5

# BUDDHISM

# बौध्ददर्शन

1. चार आर्यसत्ये, अष्टांगमार्ग, द्वादशनिदान आणि प्रतीत्यसमुत्पाद
2. अनित्य आणि अनात्मवाद, निर्वाण.
3. अव्याकृतप्रश्न आणि बुध्दाचे मौन
4. बौध्दांचे चार संप्रदाय आणि हीनयान व महायान.

1

Department Of Philosophy, Sangamner College Sangamner

## प्रस्तावना

**म**हात्मा गौतम बुध्दाने स्थापलेला धर्म म्हणजे बुध्दधर्म आणि या धर्माचे तत्त्वज्ञान ते बौध्द दर्शन होय. गौतम बुध्दाचा जन्म इ.स.पू.563 ला हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या कपिलवस्तु नगरीत एका राजघराण्यात झाला.बुध्दाला *भगवान बुध्द* म्हणतात. त्याचे मूळ नाव *सिध्दार्थ*.त्याच्या प्राचीन कुलाचे नाव 'गोतम' किंवा 'गौतम' असे होते.प्रबोधनप्राप्तीच्या प्रयत्नात त्याला जे यश आले, त्याचे प्रतीक म्हणून त्याला नंतर **'बुध्द' म्हणजे 'जागृत '** अशी पदवी दिली गेली. सिध्दार्थ राजपुत्र होता.अखिल मानवीजातीला पीडणाऱ्या दु:खाच्या दर्शनाने त्याच्या मनात परहितकार्याची प्रेरणा मिळाली.ती त्याच्या एका वचनात उत्तमरितीने व्यक्त झाली आहे.त्याने असे म्हंटले आहे की , "जगताच्या दु:खाचा उपशम होत असेल तर त्यासाठी मी प्रत्येकाच्या दु:खाचा भार स्वेच्छेने शिरावर घेण्यास तयार आहे."[1] जीवनातील सत्ये समजल्याने तो तिसाव्या वर्षी संन्यासी झाला.बुध्दाला अगदी वृध्दावस्थेत मृत्यु आला. मानवाच्या आध्यात्मिक इतिहासातील अत्यंत थोर पुरुषांमध्ये बुध्दाची गणना होते.

बुध्दाने स्वत: कोणतेही ग्रंथ लिहिले नाहीत.पण त्याने केलेल्या उपदेशावर आधारित काही ग्रंथ त्याच्या मृत्यूनंतर लिहिले गेले.ते तीन पेटारे भरुन होते.म्हणून त्यांना ***'त्रिपिटक'*** म्हणतात. पिटक म्हणजे पेटी किंवा पेटारा. ***सुत्तपिटक, अभिधम्मापिटक*** आणि ***विनयपिटक*** अशी त्यांची नावे आहेत.ते पाली भाषेत लिहीले गेले.पाली ही तत्कालिन मगध (बिहार) राज्याची बोलीभाषा होती.या ग्रंथांपैकी बहुतेक ग्रंथ (प्लेटोच्या डॉयलॉग्जप्रमाणे) संवादरूपात लिहिले गेले आहेत.

त्रिपिटक म्हणजे 'परंपरेचे तीन करण्डक' किंवा 'त्रिविध शास्त्र' किंवा 'पवित्र धर्मशास्त्र ग्रंथ' होय.
'सुत्त' म्हणजे *बुध्दवचन*,
'विनय' म्हणजे *आचारधर्माचे नियम*
' '*अभिधम्म*' म्हणजे तत्त्वज्ञानात्मक चर्चा ' होय.[2]

---


[1] एम. हिरियण्णा - अनुवाद : भा.ग.केतकर *'भारतीय तत्त्वज्ञानाची रूपरेषा '* पान 131
[2] उक्त पान 131

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## पहिले प्रवचन - सारनाथ

मानवी जीवनातील जरा (वृध्दत्व), व्याधी (रोग) आणि मृत्यू पाहून या घटना सर्व दु:खाला कारण असल्याचा साक्षात्कार गौतम बुध्दाला झाला. तपश्चर्येनंतर जे ज्ञान प्राप्त झाले, ज्या धर्माचे ज्ञान झाले त्यासंबंधातील पहिले प्रवचन त्याने वाराणसीजवळ *सारनाथ* येथे पाच तपस्वी साधूंसमोर दिले .या प्रवचनास **'धर्मचक्रप्रवर्तन'** ***(धम्मचक्क पवत्तन)*** असे म्हणतात.भारताच्या राष्ट्रध्वजावर असलेले अशोकचक्र हे या धर्मचक्राचेच प्रतीक आहे.या प्रवचनात त्याने ज्या सत्यांचा उपदेश केला ती चार सत्ये आहेत. त्यांना *आर्यसत्ये* म्हणतात. दु:ख,दु:खाचे कारण, दु:खाचा निरोध, दु:खाचा निरोधाचा मार्ग अशी ती चार आर्यसत्ये आहेत. दु:खाचा निरोधाचा मार्ग आठ अंगांचा आहे,त्यामुळे त्यास *अष्टांगमार्ग* म्हणतात. असा मार्ग प्रथमच कुणीतरी सांगितला म्हणून त्यास ***'आर्य अष्टांगमार्ग'*** म्हणतात.



## विश्वधर्म

जैन व बौध्द धर्म हे वेदविरोधी अवैदिक धर्म आहेत.जैन धर्म भारताबाहेर जावू शकला नाही. जैन धर्म अंगीकारला गेला तो मुख्यत्वे वैश्य वर्णिय व्यापारी जमातींकडून.व्यापार, उदिम यांच्या माध्यमातून जैन व्यापारी भारताबाहेर गेले, हे खरे.तथापि ते जैन धर्माचा प्रसार करु शकले नाहीत.उद्योगधंद्यासाठी गरजेची असणारी तडजोडवृत्ती अनेकांतवादातून या वर्गाला मिळाली, पण धर्मप्रसार खुंटला.

त्याउलट बौध्दधर्म मात्र जगात पसरला. बौध्द धर्म व तत्वज्ञान जरी भारतात जन्माला आले तरी त्याचा प्रचार व प्रसार मुख्यत: भारताबाहेर झाला. जपान,चीन,थायलंड ही मुख्य राष्ट्रे फिनलंड, जावा, फिलिपाईन्स, मात्र या राष्ट्रांमध्ये बौध्दधर्म स्विकारला गेला.भारतीय विचारांचा हा एक अतिशय विलक्षण असा विकास म्हंटला पाहिजे.' पाश्चिमात्य देशांमध्ये ख्रिस्तीधर्माने संस्कृतिवहनाचे जे कार्य केले तेच पौर्वात्य देशांच्या विस्तीर्ण भूप्रदेशांमध्ये बौध्द धर्माने केले'[3] त्यामुळेच तर बौध्दधर्म विश्वधर्म बनला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदुधर्माचा त्याग करुन जगातील अनेक धर्मांपैकी ज्या धर्माची सर्वात योग्य व लोकशाही स्वरूपाचा धर्म म्हणून निवड केली तो बौध्द धर्मच होय.भारतात खरी वैचारिक क्रांती करणारा बौध्दधर्म हाच पहिला धर्म आहे.

चार आर्यसत्य व अष्टांगमार्ग हा बौध्द तत्वज्ञानाचा गाभा म्हणता येईल.अति इंद्रियोपभोग आणि अतिआत्मक्लेशदायक जीवनमार्ग ही दोन्ही टोके अतिरेकी असल्याने त्यांचा समन्वय साधणारा मध्यममार्ग

[3] उक्त पान 132

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

बुध्दाने नवा आदर्श म्हणून लोकांपुढे ठेवला.सारासार विवेकाने मध्यममार्ग साधता येतो.हा खरा शुध्दमार्ग होय.[4] या सुवर्णमध्याचे नीतिशास्त्र जगातच सर्वप्रथम बुध्दाने शोधले.शुध्द प्रज्ञा म्हणजे सद्‌गुण असे सॉक्रेटीस सांगतो. तर अज्ञानाचा नाश हेच निर्वाण, असे बुध्द सांगतो. आर्य अष्टांगमार्ग ही केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक नीती विचारात बुध्दाने घातलेली भर अतिशय महत्वाची आहे.

नीती म्हणजे काय ? व्यक्तिगत नीती व सामाजिक नीती यांच्यात परस्पर सामंजस्य का असले पाहिजे ? लोक अनैतिक वागत असले तरी *'मी नैतिक का वागावे'* अशा समस्यांची चर्चा बुध्द अधिक वैज्ञानिक पध्दतीने करतो. गौतम बुध्द हा व्यावहारिक नीतिशास्त्रज्ञ होता. आत्मा,कर्म,पुनर्जन्म, ईश्वर, ब्रह्म अशा कधीही अनुभवास न येणाऱ्या गोष्टी ऐवजी तो रोजच्या दैनंदिन प्रश्नांना अधिक महत्व देणारा आहे. पुरुषार्थ व्यवस्था व वर्ण व्यवस्था सांगते त्यापेक्षा जास्त व्यावहारिक मार्ग बुध्द सर्वांना सुचवितो.

भारतीय तत्वज्ञान विचार ज्या मुख्य समस्येने सुरु होतो ती समस्या म्हणजे दु:ख. तिचा विचार इतरांप्रमाणे गौतम बुध्दाने सुध्दा केला; इतर तत्वज्ञाने दु:खाकडून सुखाकडे जाण्यास शिकवितात.इतरांच्या मते सुख मिळविण्यात काहीही गैर नसून तोटाही काही नाही, पण गौतम बुध्द मात्र सुख व दु:ख या दोन्हीतून मुक्ति मिळवून व्यक्तीने परम शांती कशीला कसे उपलब्ध व्हावे,ते शिकविले.बुध्दाच्या मते व्यक्तिने दु:ख टाळावेच पण सुख देखील टाळावे कारण ते नंतर दु:खच निर्माण करते.त्यामुळे दोन्ही टाळून एका संतुलित शांत अवस्थेला प्राप्त करुन घ्यावे. तिला बुध्द ***'निर्वाण'*** असे म्हणतो. बुध्दाचा आर्यसत्याचा सिध्दांत पुढील प्रमाणे :

## 1. पहिले आर्य सत्य

## दु:ख

जगात दु:ख आहे आणि भरपूर आहे. त्यामुळेच त्याकडे दुर्लक्ष होते. थोडेसे सुख मिळाले की दु:ख विसरले जाते. आपण स्वत:चे दु:ख विसरतोच पण इतरांच्या दु:खाची दखल घेण्यासही कधी तयार नसतो . बुध्दांच्या मते दु:ख ही एक अतिशय गंभीर व महान तात्विक वस्तू आहे. तिच्या अस्तित्वाची सतत जागती जाणीव ठेवली पाहिजे. दु:खाची कदर केली पाहिजे.त्याचा आदर केला पाहिजे. म्हणून बुध्द घोषणा करतो , '' दु:ख हे पहिले आर्यसत्य आहे . त्याचा विसर पडू देवू नका.''

तथापि ' अति तेथे माती ' या न्यायाने दु:ख भरपूर असल्याने दुर्लक्षिले जाते खरे.पण बुध्द दु:खाच्या जगातील प्रमाणापेक्षा त्याचे अस्तित्व लक्षात घेतो.मुळात आपण प्रत्येकजण इतके पिडलेले, गांजलेले असतो की दु:ख विसरुनच जातो. जिथे,आपण आपलेच दु:ख विसरतो तिथे इतरांच्या दु:खाची काय कथा ? ते लक्षात घेण्याइतपत आपण संवेदनक्षम राहात नसतो.तीच संवेदना जागी करण्याचे आवाहन बुध्द करतो. एवढेच नव्हे तर दु:ख हे एक वस्तूंचे स्वरूप लक्षण आहे , याची जाणीव करुन देतो. *सब्ब दु:खम् दु:खम् !*

## 2. दुसरे आर्यसत्य :

## दु:ख कारण : दु:ख समुदय (दु:खाचा उगम)

आहे ते स्विकारले पाहिजे,यात शंका नाही आता पुढचा प्रश्न दु:ख का आहे ? कारणाशिवाय कोणतीही घटना घडत नाही.त्यामुळे दु:खालाही कारण असले पाहिजे.म्हणून *दु:खाला कारण आहे*,हे दुसरे आर्यसत्य आहे. दु:खाचे कारण म्हणजे अमर्याद वासना होय. वासना म्हणजे इच्छा.वासनेला बुध्द ' *तृष्णा* ' (

[4] ॲरिस्टॉटलने सुचविलेला ' सुवर्णमध्य ' मार्गही साधारण अशाच स्वरूपाचा आहे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

तहान ) असे म्हणतो.तृष्णेमुळे दु:ख निर्माण होते.सतत काहीतरी हवे असणे म्हणजे सतत इच्छा करणे ही वासना होय. या तृष्णेचे तीन प्रकार :

1. *कामतृष्णा* : इंद्रियसुखाची तृष्णा
2. *भवतृष्णा* : या जगाविषयीची तृष्णा
3. *विभवतृष्णा* : पारलौकिक वैभवाची आकांक्षा



तृष्णा का निर्माण होते ? तर ती अज्ञानातून निर्माण होते. अज्ञान कशाचे ? बौध्द तत्त्वज्ञानानुसार अज्ञानाचे दोन अर्थ आहेत. ते असे :

1. " आत्मा नाही " या सत्याचे ज्ञान नसणे, हे अज्ञान.
2. दु:ख, दु:खाचा उगम (कारण), दु:खाचा निराकरण आणि दु:खनिराकरणाचा मार्ग, या विषयीचे अज्ञान.

या दोन्ही अज्ञानांचा नाश केला तर तृष्णा शमेल आणि मग दु:खही संपेल. अज्ञानामुळे दु:ख किंवा दुरित कसे निर्माण होते, याचा शोध घेणे हा बुध्दाचा आद्य हेतू होता. त्याच्या मते एकदा दु:खनिर्मितीची प्रक्रिया जाणली गेली की तिच्या परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्गही सापडतो.त्या प्रक्रियेविषयीचा सिध्दान्त म्हणजे *द्वादशनिदान सिध्दान्त '* होय.

## 3. तिसरे आर्य सत्य :

## दु:ख निरोध

निरोध करुन दु:ख नाहीसे करता येते. तृष्णा ही दु:खाचे कारण असते. या कारणाचेही कारण आहे; ते आहे अज्ञान ! या तृष्णेचा उपशम झाला की दु:ख नाहीसे होते.म्हणजे कारण व कार्य दोन्हीही नष्ट करता येतात.एवढेच नव्हे तर कारणाचेही कारण असणारे अज्ञान सुध्दा नष्ट करता येते, असा दिलासा बुध्द देतो. यास *दु:ख निरोध* असे म्हटले आहे.तृष्णेचा संपूर्ण त्याग म्हणजेच सम्यक् वैराग्य किंवा अनासक्ती होय.

थोडक्यात, प्रथम बुध्द दु:खाची जाणीव करुन देतो नंतर त्याचे कारण सांगतो आणि मग ते नष्ट करता येते असा दिलासा देतो.आता तो त्या दु:ख निरोधाचा मार्गही सांगतो म्हणून दु:ख निरोधाचा मार्ग हे चौथे आर्यसत्य होय

## 4. चौथे आर्यसत्य :

## दु:ख निराधाचा मार्ग : दु:ख निरोध गामिनी प्रतिपदा

बुध्दाच्या मते जगात दु:ख आहे. दु:खाचे कारण तृष्णा आहे.दु:ख आणि तृष्णा दोन्हीही नष्ट करता येतात.हा मानवी जीवनातील दिलासा आहे. कसे नष्ट करावयाचे दु:ख आणि तृष्णा ? तर त्याचा एक विशिष्ट मार्ग आहे. ही एक साधना आहे . आठ अंगानी किंवा आठ टप्प्यांनी हे दु:ख नष्ट करता येते. म्हणून त्यास अष्टांग मार्ग असे म्हणतात. त्यास *'आर्य अष्टांगिक मार्ग'* असेही म्हटले आहे.प्रत्येक अंगास सम्यक् म्हणतात.सम्यक् म्हणजे शुभ,शिव, चांगले किंवा योग्य.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

## आर्य अष्टांगमार्ग

1) *सम्यक दृष्टी* : चार आर्य सत्याचे ज्ञान
2) *सम्यक संकल्प* : चांगला विचार,सर्व प्राणी मात्राविषयी प्रेम, आदर बाळगणे.
3) *सम्यक वाचा* : चांगले बोलणे,खोटे न बोलणे, परनिंदा न करणे, कटु शब्द न उच्चारणे.
4) *सम्यक कर्मांत* : चोरी न करणे, दुसऱ्याचे प्राण न होणे. इंद्रियावर संयम ठेवणे.
5) *सम्यक आजीव* : योग्य मार्गाने नोकरी धंदा करून उपजीविका करणे.लबाडी शोषण न करणे.
6) *सम्यक व्यायाम* : मनातील वाईट विचार काढणे व त्याजागी शुभ विचार स्थापने.
7) *सम्यक स्मृती* : अनित्यतेची जाणीव ठेवणे, ''मी '' नावाचा आत्मा नाही याचे स्मरण ठेवणे
8) *सम्यक समाधी* : परम शांती अनुभवणे.



या आठ अंगांचे वर्गीकरण तीनात केले जाते :

**(1) सम्यक प्रज्ञा**
**(2) सम्यक शील**
**(3) सम्यक समाधि**

### *अ) सम्यक प्रज्ञा :*

प्रज्ञा म्हणजे हे सर्व जग क्षणभंगुर आहे,दु:खमय आहे, आत्मा नाही असे जाणणे, लक्षात ठेवणे

### *ब) सम्यक शील :*

शील म्हणजे सदाचरण.आचरणाचे नियम.आचरण योग्य राहवे यासाठी प्रयत्न करणे म्हणजे सम्यक शील.असे दोन प्रकारचे नियम आहेत भिक्षुंसाठी व सर्वसामान्य लोकांसाठी. भिक्षुसाठीचे नियम दहा तर सर्व सामान्यांसाठी पाच नियम आहेत. त्यांना *' पंचशील '* म्हणतात ते पुढील प्रमाणे :

**पंचशील :**

1. *प्राणातिपात - विरती :* दुसऱ्याचे प्राण न घेणे = अहिंसा बाळगणे
2. *अदत्तादान - विरती :* न दिलेली वस्तु न घेणे = चोरी न करणे.
3. *काममिथ्याचार - विरती:* बेकायदा मार्गाने कामपूर्ती न करणे
4. *मृषावाद - विरती :* खोटे न बोलण = सत्यवचनी असणे = सत्याग्रही असणे.
5. *सुरा - मैरेय - प्रमाद स्थान विरती :* मद्यपान न करणे , अशा जागी न जाणे

### *क) सम्यक समाधि (ब्रह्मविहार )*

सम्यक प्रज्ञा व शील यांच्या पालनानंतर व्यक्तीला शांत अशा भावनाचा अनुभव येतो .ही ध्यानाची भावना असते. त्या ध्यानावस्थेचा अभ्यास करावयाचा असतो याचा भावनांना बुध्द *' ब्रह्मविहार '* असे म्हणतो. ते पुढीलप्रमाणे :

(1) **मैत्री** : *प्राणिमात्रांवर प्रेम करणे*
(2) **करुणा** : त्यांची दु:खे लक्षात घेवून त्यांच्याविषयी करुणाभाव बाळगणे
(3) **मृदिता** : आनंद, इतर सुखात सहभाग
(4) **उपेक्षा** : चित्त तटस्थ करणे. समत्वभाव बाळगणे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

हे केल्यानंतर म्हणजे 'अष्टांगमार्ग' पालना नंतर निर्वाण प्राप्त होते. त्यासाठी साधकाने काही गोष्टींना शरण गेले पाहिजे.नम्र झाले पाहिजे त्यास बुध्द ***त्रिशरण वंदना*** असे म्हणतात. ती पुढील प्रमाणे.(पण ती स्वत: बुध्दाने दिलेली नाही.)

*बुध्द जिवतम परीयन्त सरणम गच्छामि*
*धम्म जिवितम परीयन्त सरणम गच्छामि*
*संघम् जिवितम परियन्त सरणम गच्छामि*



## द्वादशनिदान आणि प्रतीत्यसमुत्पाद

### द्वादश-निदान

दु:ख कारण या आर्यसत्याचे निरुपण करताना 'द्वादश-निदाना' चा सिध्दान्त सांगितला गेला.दु:खाचे मूलकारण अज्ञान होय. हे अज्ञान दोन प्रकारचे असते.

(1) अहंकार (मी) आणि ममत्व (माझे) यांचा उगम असलेली आत्मकल्पना.

(2) चार आर्यसत्यासंबंधीचे अज्ञान.

अज्ञानापासून सुरुवात होवून दु:खात रूपांतरित होणारी एकंदर बारा कारणांची मालिका बुध्दाने सांगितली. या मालिकेतील प्रत्येक दुव्याला *'निदान'* म्हटले आहे. त्या बारा दुव्यांना 'द्वादशनिदान' हे नाव दिलेले आहे.ही निदाने पुढीलप्रमाणे होत : अज्ञान, संस्कार, विज्ञान, नामरुप, षडायतन, स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव, जाति आणि जरामरण.

1. अज्ञान - संस्काराचे कारण.
2. संस्कार - सूक्ष्म स्वरूपातील राग, द्वेष, मोह इत्यादी विकार.
3. विज्ञान - राग, द्वेष करणाऱ्या 'मी ' ची जाणीव.
4. नामरूप - नाम म्हणजे मन:पिंड व रुप म्हणजे शरीर-पिंड.
5. षडायतन - मनासह सहा इंद्रिये व त्यांची सहा कार्यक्षेत्रे.
6. स्पर्श - इंद्रियांचा त्यांच्या विषयांशी संयोग.
7. वेदना - वेदना म्हणजे सुखदु:खांचा अनुभव.
8. तृष्णा - अनुभवामुळे तृष्णेचा जन्म.
9. उपादान - तृष्णेची आत्यंतिकता म्हणजेच उपादान. म्हणजे आसक्ती.
10. भव - आसक्तीतूनच पुनर्जन्मास कारणीभूत होणारे कर्म.
11. जाति - कर्मामुळेच प्राणी जन्मास येतो.हे जन्मास येणे = जाति.
12. जरामरण - म्हातारपण व मरणोन्मुखता.

या बारा निदानांची तीन जन्मात विभागणी केलेली करण्यात आली आहे.

1. पूर्वजन्म : अज्ञान आणि संस्कार.
2. विद्यमान जन्म : विज्ञान ते भव.
3. पुनर्जन्म : जाति व जरामरण.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

जन्मत्रयाला व्यापणा-या या बारा निदानांच्या मालिकेला ***भवचक्र*** असेही म्हटले जाते.

## प्रतीत्यसमुत्पाद

'द्वादशनिदाना' मधील लगतच्या कुठल्याही दोन दुव्यांमधील संबंधाला *प्रतीत्यसमुत्पाद* म्हणतात.एका अर्थाने हा कारणकार्य संबंधाचा सिध्दान्त आहे. *प्रतीत्यसमुत्पाद* म्हणजे ' परस्परसंबंधामुळे उद्भवणे' , पर्यायाने ' ते उपस्थित असले म्हणजे हे अस्तित्वात येते; त्याच्या उद्भवामुळे हे उद्भवते ''.म्हणजे काही घटक उपस्थित असतील तर विवक्षित परिणाम उद्भवतो.या नावाचे त्याचे तीन अर्थ होतात.



### *1. पहिला अर्थ : अनिवार्य अवलंबित्व*

पहिली गोष्ट लक्षात ठेवावयाची ती ही की, जगातील प्रत्येक धर्माची उत्पत्ती दुस-या कशावर तरी अवलंबून असते.तो धर्म आकस्मिक अथवा स्वयंभू नसतो.'धर्म' म्हणजे ज्या कशास 'हे आहे' असे म्हणता येईल ते.किंवा धर्म म्हणजे अस्तित्वाचा मूल घटक (element of Being) असेही म्हणता येईल.

बौध्दांच्या मते कुठलाही धर्म उत्पन्नाविनाशी असतो.म्हणजे, तो उत्पन्न होतोआणि अगदी लगेच नाशही पावतो. असे सतत घडत असते.पण एक धर्म उत्पन्न होण्यासाठी त्याच्या आधी दुस-या एका ठराविक धर्माची उत्पत्ती झालेली असली पाहिजे. *'ते असेल तर हे घडते'* (अस्मिन् सति इदम् भवति) असा 'प्रतीत्यसमुत्पाद' याचा शब्दश: अर्थ होतो.अनुभवक्षेत्रातील प्रत्येक धर्म दुस-या कुठल्या तरी धर्मावर अवलंबून असतो. निरनिराळया धर्मांमधील हे अनिवार्य अवलंबित्व म्हणजेच 'प्रतीत्यसमुत्पाद' नावाच्या संबंधाचा पहिला अर्थ होय.

### *2. दुसरा अर्थ - 'ते' आणि 'हे' ही एक नव्हेत*

प्रतीत्यसमुत्पादाच्या सिध्दांताप्रमाणे 'ते घडले तर हे घडते' याचा अर्थ असा की, 'ते' आणि 'हे' या भिन्न गोष्टी आहेत, भिन्न धर्म आहेत. एकच नव्हेत. पण काहीजण त्यांना एकच मानतात. उदाहरणार्थ आत्मा मानणारे वेदांती समजतात की, 'हे' आणि 'ते' हे निरनिराळे विकार असून त्यांच्यामागे एकच द्रव्य असते. जसे की बर्फाचे पाणी होते, पाण्याची वाफ होते आणि अंतराळात वाफ गोठून परत त्याचे बर्फ होते. एकच द्रव्य भिन्न भिन्न रुपे घेते, त्याच्याच ठिकाणी नवीन नवीन धर्माचा, प्रादुर्भाव होतो.

नेमकी हीच कल्पना 'प्रतीत्यसमुत्पाद' सिध्दांतास झिडकारावयाची आहे. बौध्दांच्या मते जे काही आहे ते रुप अथवा धर्म यापेक्षा वेगळी काही वस्तू अथवा द्रव्य म्हणून आणखी काही अस्तित्वात नसते. 'तसे काही द्रव्य आहे' हा कल्पनेचा केवळ खेळ आहे. आत्मा नामक कोणतेही द्रव्य विकारांमागे नसते.एक विकार असेल तर दुसरा घडतो, एवढेच.'ते असेल तर हे घडते' या ठिकाणी 'ते' आणि 'हे' यांना आधार देणारे काही समान द्रव्य नाही, हा प्रतीत्यसमुत्पादाचा दुसरा अर्थ होय. जसे की बीज नसेल तर अंकुरही निर्माण होत नाही. बीज असेल तरच अंकुर निर्माण होतो, हे खरे असते. पण म्हणून बीजाचाच अंकुर होतो, असे नाही. आत्मावाद्यांच्या मते मात्र बीजातून अंकुर फुटतो याचा अर्थ बीज स्वत:च आपले रुपांतर अंकुरात करुन घेते ! बौध्द ही भूमिका नाकारतात.

वेदांती आणि बौध्द यांच्यातील हा वाद म्हणजे कार्यकारणविषयक प्रश्न आहे.आत्मावाद्यांच्या मते कार्याला कारण असते, ते दोन्ही वेगवेगळे असतात आणि एकानंतर दुसरे घडते. पण बौध्दांच्या मते ही कल्पनांच चुकीची आहे. कारणच कार्यात रूपांतरित होते. ते दोन्ही एक आहेत. कार्यकारण नावाचा वेगळा असा संबंधच

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

नसतो. त्यांच्या मते कारण नावाचा धर्म संपूर्णपणे नष्ट होतो व त्यानंतर कार्य नावाचा धर्म उत्पन्न होतो. पूर्वी नसलेला असा पण नव्यानेच उत्पन्न होतो.प्रतीत्य तत्समुत्पन्नं, नोत्पन्नं स्वभावत:। 'ते झाल्यावर हे घडते' पण 'ते' आणि 'हे' ही एक नव्हेत असा प्रतीत्यसमुत्पाद याचा अर्थ आहे. ही भूमिका मांडून बौध्द तत्त्ववेत्ते आत्मा नाकारतात.

### 3. तिसरा अर्थ- शक्तीचा प्रत्यय नाही.[5]



वेगळ्या भाषेत कारणाच्या ठिकाणी काही सामर्थ्य अथवा शकती असते व त्या शक्तीमुळे कार्य घडून येते, अशी आत्मावाद्यांची धारणा आहे. बौध्दांच्या मते ही कल्पना स्वीकारता येत नाही.आपण कितीही सूक्ष्म निरीक्षण केले तरीही कारणातून निघून कार्यात प्रवेश करणाऱ्या शक्तीचा आपणास काही अनुभव येत नाही.म्हणून ती मानण्याची जरुरी नाही. निर्व्यापारा: (अकिंचितक्रा:) सर्वे धर्मा:। आपणांस दिसते ते इतकेच की, 'ते घडते आणि मग हे होते'. तेवढेच मानावे. सामर्थ्याच्या कल्पनेचा इन्कार हा प्रतीत्यसमुत्पादाचा तिसरा अर्थ होय.

प्रतीत्य समुत्पाद सिध्दान्ताद्‌वारे बौध्दांना नित्य आत्मा नावाचे तत्त्व आणि खुद्‌द नित्यता नावाची संकल्पना नाकारावयाची आहे.ती पुढीलप्रमाणे :

## अनित्यततावाद आणि अनात्मवाद

### (1) अनित्यतावाद : क्षणभंगवाद

'सर्व धर्म अनित्य आहेत ' हे बौध्दांचे गृहीत तत्त्व असून ते सिध्द करण्यासाठी पुढील युक्तिवाद केले जातात :

### (1) अर्थक्रियाकारित्व :

जे अस्तित्वात आहे (म्हणजे जे सत् आहे) ते क्षणिकच असते. अस्तित्व म्हणजे काय ? या प्रश्नास 'अर्थक्रियाकारित्व' असे बौध्दांचे उत्तर आहे. अर्थक्रियाकारित्व म्हणजे काहीतरी घडवून आणण्याचे सामर्थ्य. जर क्रिया करण्याचे सामर्थ्य नसेल तर अस्तित्वही नाहीच. एखादी गोष्ट 'आहे' याचा अर्थ काहीतरी घडवून आणण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे असा होतो.

असे काही घडून येणे म्हणजे पहिल्या गोष्टीने नाहीसे होणे आलेच.बीजातून अंकुर फुटतो पण त्या वेळी बीज नाहीसे होते. याचाच अर्थ असा की, सर्व धर्म हे क्षणिक आहेत.पण समजा, कोणी अशी शंका काढील की कणगीत ठेवलेल्या बियांच्या ठिकाणी बीज फुटणे हे कार्य घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे. पण ते न घडता कितीतरी क्षण ते बी कणगीत तसेच राहाते.येथे कार्य घडत नाही पण कारण रूपी बी अस्तित्वात आहेच ना ? मग ते नाही, असे म्हणता येणार नाही. त्याच्या ठिकाणी कार्य घडवून आणण्याचे सामर्थ्यही आहे.पण त्यास क्षणिक म्हणता येणार नाही.

या शंकेवर बौध्दाचे उत्तर असे : जर कारणात सामर्थ्य असेल तर कार्य तत्काल घडून आलेच पाहिजे. अमुक एक कालपर्यंत ते सामर्थ्य वाट पहात राहते असे मानता येणार नाही.कारण अमुक एक काल लोटला, हे

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

[5] अठराव्या शतकातील आंग्ल तत्वचिंतक डेव्हीड ह्यूम याने 'कारण' कल्पना नाकारली. बौध्द आणि ह्यूमच्या विचारसरणीत खूपच साम्य आहे. फरक एवढाच की, ह्यूमच्या मते आजपर्यंत दोन धर्माच्या क्रमात जो अतूट संबंध दिसून आला तो याच्यापुढेही टिकून राहील असे मानण्यास काही तात्विक आधार नसतो. आजपर्यंत लाखो वर्षे रोज दर चोवीस तासांनी सूर्य उगवला म्हणून उद्याही तो उगवेल असे मानण्यास काही बुध्दीला पटणारा आधार नाही! बौध्दांनी असल्या तात्विक आधाराचा प्रश्न मुळातच उपस्थित न करता 'ते घडते आणि मग हे घडते' हा क्रम कारणकार्यसंबंधात सर्वत्र अबाधित असतो असे मानले.

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

त्या सामर्थ्याला कळणार तरी कसे ? ज्यात काहीच घडत नाही असा अमुक एवढा अथवा तेवढा काल निघून गेला याचा अर्थ काय ? तो काल एवढा - तेवढा असे म्हणताच येणार नाही. तसे म्हणण्यासाठी काही तरी घडावे लागेल. म्हणून, पदार्थ या क्षणापासून त्या क्षणापर्यंत अस्तित्वात आहे याचा अर्थ मध्यंतरी काही तरी घडले आहे असाच होईल आणि जेव्हा काही घडते तेव्हा पूर्वक्षणीचा पदार्थ नष्ट होऊन त्याच ठिकाणी दुसरा उत्पन्न झाला असेच म्हटले पाहिजे.हे विधान कुठल्याही क्षणासंबंधी करता येते, अमुकच एका असे नव्हे.

थोडक्यात म्हणजे जे सत् आहे त्याच्या ठिकाणी अर्थक्रियाकारित्व असते आणि म्हणून ते क्षणिक आहे. अर्थक्रियाकारित्वाची क्षणिकता असा थोडक्यात हा युक्तिवाद आहे.



## (2) क्षणभंगवाद : जगासंबंधी

बौध्दांच्या मते अर्थक्रियाकारिकत्व किंवा क्षणभंगवाद जगाला आणि 'मी' पणालाही लावात येईल.जगाकडे पाहाता आपल्या आजुबाजूच्या सर्वच गोष्टी नाशवंत आहेत, घर, पुस्तक, खुर्चीप्रमाणेच समोरचा डोंगर जरी घेतला तरी काही लाख वर्षांनी तो तेथे असणार नाही.नष्ट होणारी कोणतीही गोष्ट आकस्मात एका क्षणी नष्ट होते, असे मानता येणार नाही. आपणांस दृग्गोचर न होणारे फरक दर क्षणाला घडत असणार.थांबून थांबून ते फरक कसे पडावेत याचा नियम नसतो. फरक पडणे म्हणजे पहिली गोष्ट नष्ट झाली व दुसरी उत्पन्न झाली असेच मानावे लागते. याचाच अर्थ असा की, कुठलाही पदार्थ एक क्षणपर्यंत टिकून राहतो व दुस-या क्षणी त्यात फरक पडतो व तो नष्ट होतो.

असे आहे तर तोच हा मघाचा घट अशी ओळख आपणांस कशामुळे पटते? बौध्दांचे उत्तर असे की, प्रत्येकक्षणाला घट उत्पन्न होतो आणि त्याच क्षणाला नष्टही होतो. असे सतत व वेगात घडत असते.या प्रक्रियेत नष्ट होणार व उत्पन्न होणारा घट यात फरक नाही असे जाणवत असते.कारण दर क्षणाला नष्ट होऊन नवीन उत्पन्न होणारे घट एकमेकांशी अतिशय सदृश असतात. त्या सादृश्याने फसून जावून आपण त्यांच्यात तादात्म्याची कल्पना करतो.

प्रत्येकक्षणाला उत्पन्न होणे आणि त्याच क्षणाला नष्टही होणे, असे सतत घडणे म्हणजे त्यांचा संतत प्रवाह तयार होणे, असते.घट जाणला जातो म्हणजे वास्तवात घटांची एक मालिका, संतान अथवा संतति असते, आणि त्या घटसंतानालाच आपण अज्ञानाने एक घट म्हणत असतो.हा संतानवाद होय.

बौध्दमतानुसार कालाच्या संदर्भात विचार करता संघातांमध्ये अखंड परिवर्तन होत असते आणि कोणत्याही दोन क्षणी संघात एकरूप असत नाही. आत्मा आणि भौतिकविश्व हे दोन संतानप्रवाह आहेत. बुध्दाच्या मते सत्ता (Being) हे सत्य नाही, तसे सत्ताशून्यत्व (Non- being)हे ही सत्य नाही, तर केवळ ' भवन ' (Becoming)हेच सत्य आहे.सतत परिवर्तन होत असणे, संतानप्रवाह गतिमान असणे, हेच सत्तेचे अंतिम स्वरूप आहे.सतत उत्पत्ति होत असूनही कोणतीह नवीन वस्तु अस्तित्वात येत नसते. जग ही सतत अस्तित्वात येण्याची आणि नाश पावण्याची जगतप्रक्रिया आहे.ही प्रक्रिया हीच वस्तु आहे.[6]

## (3) क्षणभंगवाद : 'आत्म 'संबंधी

हा क्षणभंगवाद केवळ बाह्य जड पदार्थांना म्हणजे जगाला किंवा रुपस्कंधांनाच नाव लागू आहे असे नाही, तर आंतरिक पदार्थांना म्हणजे आत्मा नावाचा तत्त्वालाही लागू आहे.वेदांती इत्यादि आत्मावादी ज्याला स्थिर आत्मा म्हणतात तसा आत्मा नसतो. या ठिकाणी बौध्द 'चित्तचैत्यस्कंध ' नावाची संकल्पना मांडतात. जसे

[6] एम. हिरियण्णा - अनुवाद : भा.ग.केतकर *'भारतीय तत्त्वज्ञानाची रूपरेषा '* पान 138

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

गेल्या क्षणीचा घट आणि या क्षणीचा घट हे जसे एकमेकांहून निराळे, तसेच 'गेल्या क्षणीचा' मी आणि 'या क्षणीचा' मी हेही एकमेकांपासून वेगळेच असतात.

पण बाह्य पदार्थांसंबंधी एक वेळ हे मानले तर ठिक पण स्वत:संबंधी, 'मी' संबंधी क्षणभगवाद कसा स्वीकारता येईल? कालचा मी आणि आज झोपून उठलेला मी हे जर निराळे असू, तर काल रात्री मी अंथरुणावर पडलो हे स्मरण कसे शक्य होते ? यावर बौध्द अनात्मवाद मांडतात. सर्व बौध्द पंथांना समान असणारे आणखी एक तत्व म्हणजे अनात्मवाद. त्याचे स्वरुप असे :



## अनात्मवाद

बौध्दांच्या मते जग सतत परिवर्तनशील आहे, त्यामुळे जगात स्थिर असे काहीही तत्त्व नाही. हाच नियम आत्मा नामक द्रव्यालाही लागू आहे. आपल्या अनुभवास येणा-या परिवर्तनशील गुणधर्मांना आश्रय देणारा आत्मा नामक काहीही नित्य पदार्थ नसतो, हा त्यांचा अनात्मवाद होय. त्यांच्या मते प्रत्येक जीवाला स्कंध असतो. स्कंध म्हणजे संघात होय.

'जीव', 'सत्व','पुरुष' किंवा 'व्यक्ति' या संकल्पनेऐवजी बौध्द दर्शनात 'पुद्गल' [7] ही संकल्पना आहे. पुद्गल म्हणजे निरनिराळया स्कंधाचा एक संघात. स्कंध म्हणजे अनेक धर्मांचा एक समुदाय. पुद्गल अथवा जीव हा नाम आणि रुप या स्कंधांचा बनलेला आहे. 'नाम' म्हणजे सा-या मन:प्रवृत्ती.रुप म्हणजे जड पदार्थ.

पुद्गल अथवा व्यक्ती ही रुप, वेदना, संज्ञा संस्कार व विज्ञान अशा पाच स्कंधाची मिळून झालेली असते. रुप म्हणजे व्यक्तित्वाचा भौतिक अंश, वेदना म्हणजे सुखाची अथवा दु:खाची भावना (feeling), संज्ञा म्हणजे वस्तूची जाणीव (perception), संस्कार म्हणजे वासनात्मक प्रवृत्ती (conative disposition)व विज्ञान म्हणजे निश्चित आकार नसलेली जाणीव (sensation) असे अर्थ केलेले आहेत. बौध्द मताप्रमाणे मानवी व्यक्ती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून या धर्माच्या समुदायांचे म्हणजे या पंचस्कंधाचे एकत्र राहणे एवढेच आहे.

उदाहरणार्थ एखादे फूल घेतल्यास जसे गंध-रंग-स्पर्श इत्यादी धर्म फूल या पदार्थाच्या ठिकाणी राहतात. या सर्व धर्माहून फूल हे वेगळेच आहे. फूल हे द्रव्य एकच असून हे धर्म थोडेबहुत बदलेले, तरा फूल स्थिरच राहते, असे समजले जाते.फूल नावाचे द्रव्य स्थिर असून धर्म बदलतात, असे वाटते. पण बौध्दांना हा द्रव्यपदार्थ नाकारावयाचा आहे. गंध-रंग-स्पर्श इत्यादी धर्माहून वेगळा असा फूल नावाचा काही द्रव्य पदार्थ नाही, कारण त्याचा आपणास अनुभव नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

उलट फूल म्हणजे या सर्व धर्माचा संघात म्हणजेच फूल, असा त्यांचा सिध्दान्त आहे. हा नियम ते आत्मा संकल्पनेला लागू करून आत्मा नाकारतात. त्यांच्या मते प्रतिक्षणी निर्माण होणा-या राग, द्वेष, इच्छा, सुख, दु:ख, संज्ञा इत्यादी चित्तधर्मांना आधारभूत अशा एक स्थिर पदार्थाची आपण कल्पना करतो व त्यास आत्मा म्हणतो. पण वास्तवात या निरनिराळया चित्तधर्माच्या समुदायांचा संघ असतो.

या संघाताहून वेगवेगळया स्थिर आत्म्याची कल्पना आपण करतो तीच आपल्या तापाला कारण होते. आत्मा असा पदार्थ नाहीच.जसे जड वस्तूंच्या धर्मांना काही आश्रय नसतो तसे चेतन पुद्गलांच्या चित्तधर्मांना काही आधारद्रव्य नाही.जे आहेत ते केवळ धर्म आहेत. धर्माचे संघात व त्या संघातांचे संतान हेच विश्वाचे स्वरुप असते. हाच अनात्मवाद किंवा नैरात्म्यवाद होय.

[7] जैन दर्शनात पुद्गल याचा अर्थ याहून फारच निराळा आहे.तेथे पुद्गल म्हणजे अणू.

Department of philosophy, Sangamner college, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

ग्रीक राजा मिलिंद (मिनॅंडर) व भिक्षु नागसेन यांची गोष्ट प्रसिध्दच आहे.[8] राजा भेटावयास आला असता नागसेनाने अनात्म - सिध्दान्ताचे प्रवचन केले.परंतु राजाची खात्री न झाल्याने नागसेनाने प्रश्न केला, 'महाराज आपण कसे आलात? पायीच आलात की काय ?' राजा म्हणाला,'नाही, मी रथातून आलो'.नागसेन म्हणाला, 'रथ म्हणजे काय ? चाके म्हणजे रथ की कणा म्हणजे रथ की घोडे म्हणजे रथ ? असल्या निरनिराळया अवयवांहून वेगळा असा रथ नावाचा पदार्थ दाखविता येईल काय ? नाही ! कारण रथ म्हणजे या सर्व अवयवांचा केवळ संघातच होय. हीच गोष्ट ज्यास आपण 'मी' म्हणतो त्याचीही होय.राजा, 'तू', किंवा 'मी' धर्माच्या स्कंधाचे संघातच आहोत''.

अगदी तसे आत्म्यासंबंधी आहे, ज्यास आत्मा म्हणतात तो खरा आत्मा नसतो तर विविध स्कंधांचा, धर्मांचा संघात असतो. 'रथ' हा शब्द विशिष्टरितीने जोडलेल्या भागांचे किंवा अवयवांचे प्रतीक आहे, तसेच ' आत्मा' हा शब्द काही शारीरिक आणि मानसिक घटकांच्या संघाताचे प्रतीकचिन्ह आहे.आत्मा नसतोच, जे काही चैतन्य आहे ते केवळ चित्तात उमटलेल्या स्कंधाचा संघात आहे. तो प्रत्येक क्षणी निर्माण होतो आणि त्याचक्षणाला नष्टही होतो.या क्षणीचा चित्तचैत्तस्कंध (म्हणजे 'मी') नष्ट झाला म्हणजे त्याच्याशी अतिशय सदृश असा दुसरा प्रत्यय[9] निर्माण होतो. हा प्रत्यय नवा असूनही पूर्वीच्या प्रत्ययाशी सदृश असल्याने दोन्ही एकच आहेत असे वाटते.पण मुळात तो नवीनच असतो.या प्रक्रियेत घडते असे की या क्षणीचा 'मी' आपला सारा अनुभव आणि परंपरेने आपल्याकडे आलेले सारे संस्कार पुढच्या क्षणीच्या 'मी' कडे संक्रमित करुनच नष्ट होतो. पुन्हा तो 'मी' नष्ट होताना पुढच्या 'मी'कडे आधीचे व नवे संस्कार देवून नष्ट होतो, असे सतत घडते.त्यामुळे काळाच्या सातत्याचे स्मरण शक्य होते.रीले रेसमध्ये प्रत्येक खेळाडू आपल्याकडील रुमाल पुढच्या खेळाडूच्या स्वाधीन करुन निवृत्त होतो तसेच काहीसे हे घडते.

यावर आत्मावादी विरोधकांनी दोन आक्षेप घेतले.

पहिला असा की संतानातील प्रत्येक व्यक्तीस पाठीमागच्या व्यक्तीचा अनुभव संग्रहीत करता येईल असे वादासाठी मानता येईल. पण या सर्व संतानाचाच अनुभव घेणारा असा कुणीतरी संतानाबाहेर असणार ना ! ''चित्तचैत्यस्कंधाचे संतान सुरु आहे'' अशी जाणीव त्या संतानाच्या बाहेरच असली पाहिजे.संतान म्हणजे 'क' नंतर 'ख' येणे, वख' नंतर 'ग' येणे... असे नव्हे, तर त्याचा अर्थ (क+ख+ग+...) अशा प्रकारचा समुदाय असा होतो. नुसते क+ख+ग+... असा नव्हे. या समुदायाचे भान 'क' ला अथवा 'ख' ला अथवा 'ग' ला होणार नाही.तो ज्ञाता या संतानाबाहेरचा असल्याशिवाय संतान अथवा समुदायच संभवणार नाही .

थोडक्यात, दोन प्रत्यय सदृश आहेत, हे ज्ञान दोन्हींपैकी कुठल्याही एका एका प्रत्ययाला होणार नाही. सादृश्याचे ज्ञान होणारी जाणीव सदृश पदार्थाहून निराळीच असली पाहिजे. या अप्रवाही जाणिवेलाच आम्ही आत्मा मानतो.

दुसरा आक्षेप असा की बाहय पदार्थाच्या बाबतीत त्यांच्या सारखेपणामुळे फसून जावून आपणांस तादात्म्याचा भास होतो हे एक वेळ मानता येईल. पण 'कालचाच' मी 'आजही' आहे अशी स्वत:संबंधीची जाणीव ही भ्रमात्मक कशी मानता येईल?

यावर बौध्द तत्वचिंतकांचे उत्तर असे की 'काल ज्याने पाहिले तोच मी आज स्मरत आहे' ही तादात्म्यभावनाच भ्रम आहे.तादात्म्य नसतेच , ते संतान असते. संतानाला तादात्म्य मानणे चूक आहे. जसे दिव्याची ज्योत जळताना भिन्न भिन्न तैलकण असूनही ज्योत एकच वाटते. दर क्षणाला नवीन ज्योत उत्पन्न होत

---

[8] ही कथा ' मिलिंद राजाचे प्रश्न ' या नावाने प्रसिध्द असून ती इ.स.पू. पहिल्या शतकात रचली गेली असावी.

[9] विज्ञान = जाणिवेचा प्रकार = चित्तचैत्तस्कंध = a form of consciousness

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

असतानाही त्यांच्यातील सादृश्यामुळे त्या ज्योति:संतानाला आपण *तीच ही* ज्योत असे मानतो.तद्वतच दर क्षणाचा 'मी' भिन्न असतानाही आपणास नित्य आत्म्याचा भास होतो असेच सा-या बौध्द दर्शनांनी प्रतिपादिले.



## प्रतिसंख्यानिरोध

बौध्दांच्या मते संतान म्हणजे सतत, अखंड सुरुच राहाणे.एका प्रकारचे संतान नष्ट झाल्यास दुस-या प्रकारचे उत्पन्न होते. पण परंपरा थांबत नाही.काठीने घट फोडला की घटसंतान थांबेल पण प्रत्येक तुकडयाचे संतान सुरु होईल. मानवी देह जाळल्यावर देहसंतान थांबते पण त्यापासून पुढे निरनिराळया रासायनिक आणि भौतिक प्रक्रिया सुरुच राहणार.तीही संतानेच होत.

चित्तप्रवाहाचीही तीच गत असते. या क्षणीच्या चित्तचैत्यस्कंधापासून दुस-या क्षणी दुसरा चित्तचैत्यस्कंध निर्माण होतो. ज्योतीने ज्योत पेटवावी तसा हा क्रम सुरुच राहतो. पण बुध्दाने उपदेशिलेल्या अष्टांग मार्गाने गेल्यास म्हणजे चित्त वासनारहित करुन या प्रवाहाचा निरोध करता येतो. त्या निरोधास *'प्रतिसंख्यानिरोध'* असे पारिभाषिक नाव आहे.म्हणजे *'बुध्दिपूर्वक घडवून आणलेला नाश'* . इतर धर्म क्षणिक असतात. पण 'प्रतिसंख्यानिरोध' हा धर्म तसा नाही. चित्तचैत्यस्कंधाचा प्रवाह एकदा बुध्दिपूर्वक थांबविल्यावर परत त्यातून दुसरा प्रवाह, दुसरे संतान निर्माण होत नाही.

प्रतिसंख्यानिरोध म्हणजेच निर्वाण. त्यास असंस्कृत धर्म मानले आहे. असंस्कृत म्हणजे अमिश्र.केवल ! या कसलेही मिश्रण नसते.त्याचे संतान नसते.ती अवस्था असते.

## निर्वाण संकल्पना

निर्वाण म्हणजे शांत होणे, विझणे . कशापासून शांत होणे ? तर दु:खाच्या अग्निपासून शांत होणे, दु:खाग्नि विझविणे . आता केवळ दु:ख नष्ट करणे नव्हे तर सुख सुध्दा नष्ट करणे म्हणजे निर्वाण.कारण सु:खानंतर पुन्हा दु:ख येते आणि दु:खानंतर परत सुखाची तृष्णा निर्माण होते .म्हणून बुध्दाचा अष्टांग मार्ग केवळ दु:खातून सुटका सांगत नाही तर सुखातूनही सुटका सांगतो .तो सुख दु:खाच्या पलिकडे जाण्यास सांगतो.

निर्वाणं शान्तम्- हा बौध्द दर्शनातील शेवटचा पण सर्वात महत्वाचा सिध्दान्त. त्याचा अर्थ निर्वाण नावाची अत्यंत शांत (तृष्णेचा पूर्ण उमशम असलेली) अशी एक अनुभाव्य स्थिती आहे. निर्वाणाचे स्वरुप काय आहे ? त्याचे तीन अर्थ करता येतील.

### 1. पहिला अर्थ- *विझणे, शांत होणे.*

मानवी जीवनाला ज्योतीची उपमा बौध्द दर्शनात वारंवार दिल्याचे आढळते. त्या उपमेने जशी अनात्मता सुचवावयाची आहे तशीच जीवनाची तापदायकताही सुचवावयाची आहे.जीवन ज्योत शांत होणे, जीवनाच्या तापाचा उपशम होणे म्हणजे निर्वाण.दिव्याने दिवा लागावा तसे स्कंधाच्या एका संघातापासून दुसरा संघात निर्माण होण्याचे बारा निदानांचे रहाटगाडग्याचा प्रतिसंख्या-निरोध करणे हा निर्वाण होय.विझून गेलेल्या ज्योतीसारखी ती स्थिती असते.या अर्थाप्रमाणे निर्वाण म्हणजे 'काहीच नाही' असे होणे' pure nothingness'.हा अभावरूप अर्थ होय.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

### 2. दुसरा अर्थ- *केवळ साक्षित्वाची स्थिती*

पण निर्वाण या संकल्पनेचा भावरुप अर्थही करता येतो. तो असा की व्यक्तित्वाचा विनाश म्हणजे अस्तित्वाचा विनाश नव्हे. पंचस्कंधारुपी व्यक्तित्व विरुन गेले तरी जेथून त्याने आकार घेतला ते अखंड अस्तित्व उरुन राहील अशी कल्पना करता येते. अशी निरहंकारी आणि म्हणून केवळ साक्षित्वाची स्थिती अनुभवणे म्हणजे निर्वाण होय.

साक्षीभावाने राहाणे हे सर्वच भारतीय आध्यात्मिक परंपरेचे प्रमुख सूत्र आहे. सरोवरात लाट उठते आणि जिरुन जाते.लाट नष्ट झाली तरी सरोवरे शाबूतच राहते आणि लाटेचे खरे स्वरुप सरोवर हेच असते. निर्वाणाचा दुसरा अर्थ उपनिषदातील अखंड आनंदमय अमृतत्वाच्या कल्पनेशी जुळतो.



### 3. तिसरा अर्थ- *अनिर्देश्य, अनिर्वाच्य स्थिती.*

मृत्यूनंतर तथागताचे काय होते? तो अस्तित्वात राहतो की नाही? या प्रश्नांचे उत्तर देण्यास गौतम बुध्दाने नकार दिला.म्हणजे निर्वाण म्हणजे अशी अवस्था की जिच्यासंबंधी कसलेच विधान करता येत नाही.ती एक अनिर्देश्य, अनिर्वाच्य स्थिती आहे. हा अर्थ वेदान्तातील अनिर्वचनीय मोक्ष-कल्पनेशी जुळते.

### 4. चौथा अर्थ- *शांत अवस्था.*

बुध्दाचा उपदेश मुख्यत: नैतिक स्वरुपाचा होता.म्हणून निर्वाण म्हणजे सुखदु:खापलिकडे पूर्णावस्थेत पोचलेल्या अर्हताच्या मनाची प्रसन्न, गंभीर आणि शांत अवस्था म्हणजे निर्वाण असेही म्हणता येईल.

## दहा अव्याकृते आणि बुध्दाचे मौन

बौध्द दर्शनाची मुख्य प्रेरणा दु:खनिरोधरुपी फल मिळविणे, ही आहे. निव्वळ तात्विक काथ्याकूट करण्यात स्वत: बुध्दाला रस नव्हता.मरणानंतर तथागताचे काय होते, हा लोक शाश्वत आहे की अशाश्वत आहे अशा तऱ्हेच्या प्रश्नांना उत्तरे द्यावयाचे तो नाकारीत असे. अशा प्रश्नांना बौध्द दर्शनात अव्याकृत म्हणतात. अव्याकृत म्हणजे ज्याचे व्याकरण अथवा व्याख्यान करता येत नाही, म्हणजेच ज्यासंबंधी काही म्हणता येत नाही, असे काही. अशी अव्याकृते एकंदर दहा आहेत. ती पुढील प्रमाणे :

(1) जग शाश्वत आहे.
(2) जग अशाश्वत आहे.
(3) जगाला अन्त आहे.
(4) जग अनन्त आहे.
(5) जीव व शरीर एकच होय.
(6) जीव व शरीर ही निरनिराळी होत.
(7) तथागत मरणानंतर असतो.
(8) तथागत मरणानंतर नसतो.
(9) तथागत मरणानंतर असतोही व नसतोही.
(10) तथागत मरणानंतर असतो असेही नाही व नसतो असेही नाही.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

या दहा गोष्टींसंबंधी काहीही सांगण्याचे बुध्दाने नाकारले. कारण, एक तर त्यांची उत्तरे नुसत्या विचारशक्तीच्या आटोक्याबाहेरची आहेत व दुसरे म्हणजे ती उत्तरे कळून काही फायदा नाही.तोटाच आहे.वास्तवात दु:ख इतके अमाप आहे त्या दु:खाचा विनाश कसा होईल, इकडेच आपण लक्ष दिले पाहिजे.अंगात बाण शिरल्याने आसन्नमरण असलेल्या एखाद्या माणसाच्या अंगातील बाण काढण्यास जर कोणी परोपकारी गृहस्थ आला, तर 'तो बाण कशाचा बनलेला आहे, कोणी बनविलेला आहे इ.समजल्यावरच मी तो काढू देईन ' असे त्या शरविध्द माणसाने म्हणण्यात जेवढा शहाणपणा आहे तेवढाच शहाणपणा आपण संसार दु:खांनी विध्द झालेलो असता, असले अव्याकृत प्रश्न उपस्थित करण्यात आहे. बौध्द दर्शनाची मूळची बैठक अत्यंत व्यावहारिक आणि नीतिप्रधान होती.



## बुध्द एक वैद्य

बुध्दाच्या मते दु:ख हा जणू रोग आहे. जात, धर्म, वंश, लिंग असा कसलाही भेद न करता हा रोग प्रत्येकाला पकडतो आणि अनिवार्य इच्छा, लोभ हावरटपणा, तृष्णा हे या रोगाचे कारण आहे. चार आर्यसत्ये सांगताना रोगी व त्याची रोगमुक्ती यांवरील रुपक अभिप्रेत आहे. दु:ख हे पहिले आर्यसत्य रोग्याच्या बाबतीत त्याला अमुक एक रोग आहे, असे ठरणे हे पहिल्याने येते. मग त्या रोगाची कारणे शोधली जातात. दु:खनिरोध या तिस-या आर्यसत्याचे आरोग्य हे प्रतीक होय.चौथे आर्यसत्य म्हणजे रोग नष्ट करण्याचा मार्ग.

आयुर्वेदात रोगकारणास निदान म्हणतात.बुध्दानेही दु:खाची कारणपरंपरा सांगताना जे बारा दुवे सांगितले त्यांना 'निदान' हेच नाव दिले. औषधयोजना हा जसा आरोग्याचा मार्ग त्याचप्रमाणे दु:खनिरोध अथवा निर्वाण याच्या प्राप्तीसाठी अष्टांगमार्ग आहे. दु:ख आणि तृष्णा नष्ट करण्याचा उपाय म्हणजे अष्टांग मार्ग.हे औषध देणारा बुध्द हा एक वैद्यराज आहे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## बौध्दांचे संप्रदाय : महायान आणि हीनयान

बुध्दानुयायांत प्रथम तट पडले ते तात्विक असण्यापेक्षा धार्मिकच होते.बुध्दाच्या मृत्यूनंतर सुमारे शंभर वर्षांनी बुध्दाचा उपदेश निश्चत काय होता हे ठरविण्यासाठी एक परिषद (संगीती) भरविली गेली. त्यात एका पक्षाने बुध्दवचनांचा अर्थ शक्य तितका मुळास धरुन व शब्दश: घेण्यावर भर दिला.नैतिक आचरणाने आणि ध्यान वगैरे साधनांनी प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या प्रयत्नाने स्वत:करिता निर्वाणपद मिळवावे अशी बुध्दाची शिकवण असल्याचे मत त्या पक्षातील लोकांनी मांडले.त्यांच्यातूनच पुढे हीनयान नावाच्या धार्मिक पंथांची सुरुवात झाली.

दुस-या पक्षातील लोकांनी बुध्दवचनांचा अर्थ थोडया व्यापक रीतीने लावण्याची मुभा घेतली. ठिकठिकाणच्या लोकसमुदायाचे आचार-विचार व समजुती त्यांनी बुध्दधर्माच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला. अर्थात त्यामुळे बुध्दधर्माचे सामाजिक अधिष्ठान व्यापक झाले. या लोकांना *महासंघिक* असे नाव पडले. महासंघिकांच्यातूनच पुढे महायान पंथांचा उदय झाला. हीनयान व महायान या दोन पंथांतील ठळक फरक पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### अ ) उद्दिष्टे

स्व:तचे निर्वाण म्हणजेच अर्हत्-पद मिळविणे हे ध्येय हीनयान पंथाने ठेविले.'जगातील सर्व गोष्टी नाशवंत आहेत, म्हणून स्वत:च्या निर्वाणासाठी प्रयत्नशील आणि जागरुक रहा' (वयधम्मा संखारा, अप्पमादेन संपादेथाति, अयं तथागतस्स पच्छिमा वाचा।महापरिनिब्बानसुत्त 6.7) या बुध्दाच्या अखेरच्या शब्दावर हीनयान पंथाने भर दिला व व्यक्तीने स्वत:चा मोक्ष हे परमसाध्य मानावे अशी शिकवण दिली.

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

त्याउलट सर्व प्राणिमात्रांच्या निर्वाणासाठी व्यक्तीने प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी महायान पंथाची शिकवण आहे.स्वत: बुध्दीने आपल्या चरित्राने जो धडा घालून दिला तोच आपण गिरवावा असे त्या पंथाने मत असून प्रत्येकाने 'बोधिसत्व' हा आदर्श आपल्यापुढे ठेवावा.बोधिसत्व म्हणजे मूर्तिमंत करुणा, मूर्तिमंत प्रज्ञा. त्याकरिता अनेक जन्म घ्यावे लागले तरी चिंता नाही.

'यान' म्हणजे वाहन. महायान म्हणजे अनेक लोकांना वाहून नेण्यास समर्थ असे वाहन. लोकांचे समुदायचे समुदाय निर्वाणाप्रत नेण्यास आपला पंथ समर्थ आहे या अभिप्रायाने *'महायान'* पंथातील लोकांनी आपल्या पंथास हे नाव दिले.त्यामुळे जो पंथ फक्त एकाच व्यक्तीस निर्वाणास पोचवितो त्यास *हीनयान* अशी संज्ञा त्यांनी दिली.'हीन' याचा अर्थ 'लहान' असा होतो. पण त्यात तुच्छतेचा अंशही आहेच. तोही अभिप्रेत होता. आमचे ध्येय सर्व प्राणीमात्रांना सामावून घेणारे म्हणून उच्च, तुमचे वैयक्तिक स्वार्थाचे म्हणून कमी दर्जाचे असे महायान पंथीयांना ध्वनित करावयाचे होते

## 2) आचरण पध्दती

हीनयान हा आचरणास कठिण आहे तर महायान त्या मनाने सोपा आहे. स्थानिक लोकांच्या धार्मिक समजुतीचा महायान पंथात मिलाफ होऊ शकत असे. बुध्दाने ईश्वर नाकारला. हीनयान पंथ निरीश्वरवादास चिकटून राहिला. पण महायान पंथात मात्र हळू हळू बुध्दालाच देवत्व आहे. पूजाअर्चा, निरनिराळया त-हेचे उपचार अशा त-हेच्या कर्मकांडास महायान पंथाने उत्तेजन दिले. बुध्दाच्या कृपाप्रसादाने आपला उध्दार होऊ शकतो, बुध्दाच्या सुकृताचा काही अंश त्याला शरण गेल्याने आपणासही मिळेल ही कल्पना या पंथास मान्य होती.या कारणांनी महायान पंथाचा प्रसार फार झपाट्याने झाला.हिमालय ओलांडून तिबेट, चीन, जपान, कोरिया, मंगोलिया इकडे तो पसरला. हीनयान मात्र लंका, ब्रम्हदेश, सयाम, कांबोडिया एवढया दक्षिणेतील लहान देशांतच मर्यादित राहिला.

## 3) बाह्यवस्तूचे अस्तित्व

हीनयानात बाहय वस्तूंचे अस्तित्व मान्य केलेले आहे. फक्त त्या क्षणिक असतात यावरच भर दिलेला आहे.महायान पंथात बाहय वस्तू या विज्ञानमय आहेत असे तरी मानलेले असते किंवा त्या शून्य आहेत असे तरी सांगितलेले असते.पदार्थाचे वास्तव स्वरुप 'तथता' आहे असे महायान पंथात मानले आहे.तथा म्हणजे त्याप्रमाणे, ते जसे आहे तसे, नाम-रुप-जाति-क्रिया असल्या विकल्पांनी अथवा उपाधींनी रहित.तथतेने पदार्थाचे हे वास्तव स्वरुप दाखविले जाते.

चार संप्रदाय

बौध्द संप्रदाय-महायान व हीनयान या पंथांतून पुढे किती तरी संप्रदाय निर्माण झाले. त्यांतील बरेच संप्रदाय भारताच्या बाहेर उत्पन्न झाले.मुख्य चार बौध्द संप्रदाय आहेत.

(1) वैभाषिक, (2) सौत्रांतिक. (3) योगाचार (अथवा, विज्ञानवाद) आणि (4) माध्यमिक (अथवा, शून्यवाद) ही होत.यापैकी पहिली दोन सर्वास्तिवादी म्हणजे जड पदार्थाचे ज्ञानक्रियानिरपेक्ष अस्तित्व मानणारी (Realist) आहेत. ती दोन्ही मते हीनयान पंथांची आहेत. तिसरे व चौथे म्हणजे योगाचार (विज्ञानवाद) व माध्यमिक (शून्यवाद) ही मते महायान पंथातून निघाली.ती दोन्ही जड पदार्थाचे अस्तित्व नाकारणारी या अर्थाने चिद्वादी (Idealist) आहेत.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## परीक्षण

आधुनिक परिभाषेत बौध्द मताचे स्वरुप सांगावयाचे तर बुध्द व्यवहारवादी होता. निव्वळ तात्विक प्रश्नांचा काथ्याकूट करण्यात बुध्दाला रस नव्हता.तरीही दु:खाचा संपूर्ण उपशम करणे हा जीवनाचा मूलभूत प्रश्न सोडविताना त्याला काही तात्विक भूमिका घेणे अपरिहार्यच होते. त्या भूमिकेत अनुस्यूत असलेले सिध्दान्त बुध्दाच्या अनुयायांनी नीट उलगडून त्यांची व्यवस्थित मांडणी केला.साररुपाने त्या तात्विक भूमिकेचे वर्णन आधुनिक परिभाषेत असे म्हणता येईल की बौध्द तत्वज्ञानाची भूमिका अनुभववादी (empiricist), प्रत्यक्षवादी (positivist) आहेच, पण शिवाय प्रत्ययास येत असलेल्या घटनांच्या पाठीमागे जाऊन त्यांचा काही अदृष्ट आधार शोधण्याऐवजी त्या घटना व त्यांचा क्रम हेच ज्ञानाचे अंतिम विषय मानणारी (phenomenalist) आहे.

सर्व काही अनित्य आहे, हे मत अनुभववादावर, empiricism वर आधारलेले आहे. बुध्दिवाद (rationalism) क्षणिक अनुभूतीच्या मागे काही नित्यतत्व शोधू पाहतो.कार्यकारणविषयक प्रतीत्यसमुत्पादाचा सिध्दान्त प्रत्यक्षार्थवादातून (positivism) निघतो. 'हे होते' आणि 'मग ते घडते' असा नियतक्रमच प्रत्यक्ष दिसतो. त्याहून अधिक अशी कारणाची शक्ती अथवा परिणाम पावणारे स्थिर द्रव्य यांचे प्रत्यक्ष ज्ञान होत नाही. स्वत: बुध्दाने आपल्या मतास 'एहिपस्सिक धम्म' ('ये आणि पहा' या तऱ्हेचा धर्म') असे म्हटले आहे. प्रत्ययास जे येते, त्याच्या बुडाशी काही आधार शोधीत बसावयाचे नाही (phenomenalism)

---

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner